विद्यार्थ्यांमधील साहित्यिक सृजनशीलतेला मुक्त वाव देण्यासाठी महाविद्यालयातर्फे 'विवेकसिंधु' हा वार्षिक अंक प्रकाशित करण्यात येतो. विद्यार्थ्यांनी स्वत: लिहिलेल्या कथा, कविता, विनोद, चारोळ्या, वैचारिक लेख, महाविद्यालयांच्या विविध उपक्रमांचे वृत्तांत आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीस प्रसिद्धी दिली जाते.

## पारितोषिके (Prizes)

विद्यार्थ्यांस मिळालेले एखादे पारितोषिक त्याच्या जीवनात प्रेरणा व प्रोत्साहनासाठी मार्गदर्शक ठरून त्याच्याकडून अलौकिक असे कार्य घडू शकते. पारितोषिक हे विद्यार्थ्यांच्या अंगभूत कलागुणांना व कार्याला मिळालेली पोचपावती असते. महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांना विविध पारितोषिके देऊन गौरविण्यात येते.

**कै. श्रीमती सुलोचना श्रीधर सावंत पटेल पारितोषिक –** श्री. दिलीप श्रीधर सावंत पटेल यांच्याकडून टी.वाय.बी.ए. परिक्षेत महाविद्यालयात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यास दिले जाते.

**कै. विजय दिनकर सावंत पटेल पारितोषिक –** रु. ५००/– (पाचशे) श्री. दिपक विजय सावंत पटेल यांचेकडून टी.वाय.बी.ए. परिक्षेत महाविद्यालयात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यास दिले जाते.

**कै. श्रीधर नारायण सावंत (दादासाहेब पटेल) पारितोषिक –** श्री. दिलीप श्रीधर सावंत पटेल यांच्याकडून टी.वाय.बी.कॉम. परिक्षेत महाविद्यालयात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यास दिले जाते.

**कै. दिनकर सखाराम सावंत पटेल पारितोषिक –** रु. ५००/– (पाचशे) श्री. दिपक विजय सावंत पटेल यांचेकडून टी.वाय.बी.कॉम. परिक्षेत महाविद्यालयात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यास दिले जाते.

**सावित्रीबाई फुले पारितोषिक –** रु. ५००/– (पाचशे) प्रा. विनोदसिंह विलासराव पाटील यांच्याकडून टी.वाय.बी.ए. परीक्षेत इंग्रजी विषयात महाविद्यालयात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांस दिले जाते.

**कर्मवीर भाऊराव पाटील पारितोषिक –** रु. ५००/– (पाचशे) प्रा. संतोष मधुकर आखाडे यांच्याकडून टी.वाय.बी.ए. परीक्षेत इंग्रजी विषयात महाविद्यालयात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांस दिले जाते.

**संत कबीर पारितोषिक –** रु. ५००/– (पाचशे) डॉ. संतोष रघुनाथ रायबोले यांच्याकडून टी.वाय.बी.ए. परीक्षेत हिंदी विषयात महाविद्यालयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास दिले जाते.

**समुद्रगुप्त पाटील पारितोषिक –** रु. ५००/– (पाचशे) प्रा. डॉ. राज ताडेराव यांच्याकडून टी.वाय.बी.ए. परीक्षेत इतिहास विषयात महाविद्यालयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास दिले जाते.

**भूगोलमित्र पारितोषिक –** प्रथम रु. ३००/– (तीनशे), द्वितीय रु. २००/– (दोनशे) व तृतीय रु. १००/– (शंभर) प्रा. डॉ. राजाराम बाळासो पाटील यांच्याकडून टी.वाय.बी.ए. परीक्षेत भूगोल विषयात महाविद्यालयात प्रथम, द्वितीय व तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना दिले जाते.

**कै. आकाराम सावंत–पटेल पारितोषिक –** रु. ५००/– (पाचशे) प्रा. डॉ. बालाजी आण्णासाहेब सुरवसे यांच्याकडून टी.वाय.बी.ए. परीक्षेत अर्थशास्त्र विषयात महाविद्यालयात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यास दिले जाते.

**कै. पांडुरंग रावराणे पारितोषिक –** रु. ५००/– (पाचशे) प्रा. जगदीश राणे यांचेकडून टी.वाय.बी.ए. परीक्षेत महाविद्यालयात मराठी विषयात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यास दिले जाते.

**डॉ. रंगनाथन पारितोषिक –** रु. ५००/– (पाचशे) डॉ. सौ. विद्या शरद मोदी यांच्याकडून आदर्श वाचकाला दिले जाते.

**नारायण – संचित स्मृती पारितोषिक –** रु. ५००/– (पाचशे) प्रा. डॉ. सतीश नारायण कामत यांचेकडून टी. वाय. बी. ए. परीक्षेत महाविद्यालयात मराठी विषयात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यास दिले जाते.

## ग्रंथालय विभाग (Library)

'ग्रंथ हेच खरे गुरु' असे म्हटले जाते. ग्रंथालयामार्फत विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त वाचन साहित्य उपलब्ध करून दिले जाते. प्रत्येक शैक्षणिक वर्षात एका वाचकास 'आदर्श वाचक' म्हणून गौरविण्यात येते. ग्रंथालयामार्फत नियतकालिके, स्पर्धा परिक्षेस उपयुक्त पुस्तके, वर्तमानपत्रे असे वाचन साहित्य विद्यार्थ्यांना पुरविले जाते.

### गोल्ड कार्ड

महाविद्यालयात प्रथम आणि द्वितीय येणाऱ्या आणि विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना गोल्ड कार्ड दिली जातात. गोल्ड कार्डधारक विद्यार्थ्यांना १५ दिवसांकरिता चार पुस्तके मिळतात. **त्यासोबतच कार्यालयांमधील काम पूर्ण करण्याकरिता रांगेत उभे रहावे लागत नाही. यात विद्यार्थ्यांचा वेळ वाचतो.**

**पुस्तक देवघेव :**

१) विद्यार्थ्यांना ग्रंथालय सभासदपत्रावर (बी.टी.) पाठ्यपुस्तके, कथा, कादंबऱ्या, नाटके, आत्मचरित्र, काव्यसंग्रह, निबंधसंग्रह, ललित साहित्य फक्त सात दिवसांकरता दिले जातील.

२) संदर्भग्रंथ व दुर्मिळ ग्रंथ ग्रंथालयाबाहेर दिले जात नाहीत. मात्र ते ग्रंथालयातील वेळेत ओळखपत्रावर घेऊन वाचनालयात बसून वाचता येतील.

३) वाचन, लेखन, कथाकथन, निबंध, वक्तृत्व स्पर्धेतील विद्यार्थ्यांना संबंधित विभागाने शिफारस केल्यास ओळखपत्रावरील पुस्तकाशिवाय आणखी दोन ग्रंथ दिले जातात.

४) सभासदपत्रावरील पुस्तके मुदतीत जमा न केल्यास प्रतिदिन १ रुपया विलंब शुल्क आकारण्यात येईल. परंतु ज्या ग्रंथांना जादा मागणी असते ते मुदतीत जमा न केल्यास प्रतिदिन ५ रुपये दंड आकारण्यात येईल.

५) वार्षिक परीक्षा सुरू होण्यापूर्वी ग्रंथालयाची सर्व पुस्तके जमा करणे बंधनकारक आहे.

६) दिवाळीच्या सुट्टीत हा विभाग चालू राहील.

**पुस्तक पेढी**

१) मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी पुस्तक पेढी उपलब्ध आहे. यामध्ये क्रमिक पुस्तके समप्रमाणात वर्षभरासाठी दिली जातात. त्यासाठी जातीच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत ग्रंथालयात जमा करावी लागते.

२) सिद्धिविनायक पुस्तक पेढीमार्फत कॉमर्सच्या विद्यार्थ्यांना वर्षभरासाठी संपूर्ण संच दिला जातो.

३) पुस्तक पेढीमार्फत घेतलेली क्रमिक पुस्तके वार्षिक परीक्षेच्या अगोदर चार दिवस जमा करावीत.

**वाचनालय**

१) वाचनालय सकाळी ८.३० ते सायंकाळी ४.०० पर्यंत उघडे राहील.

२) वाचन कक्षात ओळखपत्राशिवाय प्रवेश मिळणार नाही.

३) वाचन कक्षात पाठ्यपुस्तके, संदर्भ ग्रंथ, स्पर्धा परीक्षेची पुस्तके, मासिके, दैनिके, नियतकालिके, शब्दसंग्रह, प्रश्नपत्रिका संच इत्यादी वाचनसाहित्य ओळखपत्रावर मिळेल.

४) वाचनालयात विद्यार्थ्याने शांतता पाळावी व ग्रंथालय नियमांचे पालन करावे.

५) वाचनालयातून ओळखपत्रावर घेतलेले वाचन साहित्य घरी जाण्यापूर्वी परत करावे.

**नियमावली**

१) ग्रंथालयातून ग्रंथ घेताना ग्रंथ व त्यातील आतील पाने तपासून घ्यावीत.

२) ग्रंथाचे पाने फाडल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

३) ग्रंथ हरवल्यास किंवा अत्यंत खराब केल्यास नवीन ग्रंथ उपलब्ध करून द्यावा लागेल. अन्यथा अद्ययावत ग्रंथाच्या किंमतीच्या दुप्पट रक्कम वसूल केली जाईल.

४) ग्रंथालयात असभ्य वर्तन करणे व शिस्त न पाळणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ग्रंथालय सवलती बंद केल्या जातील.

५) ग्रंथालय तक्रारी संदर्भात ग्रंथपालाशी संपर्क साधावा.

६) ग्रंथालयामध्ये विविध नियतकालिके उपलब्ध असून स्पर्धा परीक्षेस उपयुक्त अशी अद्ययावत पुस्तके विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जातात. स्पर्धा परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्यादा दोन पुस्तके अभ्यासण्यासाठी दिली जातात. याव्यतिरिक्त आयकार्डवर एक पुस्तक दिले जाते.

## विद्यार्थी गट मार्गदर्शन योजना (Mentor - Mentee Scheme)

आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक व शैक्षणिक कार्यातील अडीअडचणी दूर करण्यासाठी वैयक्तिक गट मार्गदर्शन योजना काम करीत असते. या योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश घेताना मार्गदर्शन करणे, ग्रंथालयातील संदर्भग्रंथ, मासिके, नियतकालिके इत्यादी संबंधी माहिती देणे, परीक्षा फॉर्म भरताना मार्गदर्शन करणे इत्यादी कामात मदत केली जाते.

या योजनेचे कामकाज सुकर होण्यासाठी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांचे त्यांच्या गावानुसार गट तयार केले आहेत. विद्यार्थ्यांच्या अपेक्षित संख्येनुसार त्या त्या गावाकरता एक किंवा दोन प्राध्यापकांवर त्यांच्या गावाचे गट मार्गदर्शक म्हणून जबाबदारी सोपवली आहे. या विभागांतर्गत कामकाज करीत असताना सदरचे गट मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या गावी जाऊन त्यांच्या घरी पालकांच्या भेटी घेतात. विद्यार्थ्यांची प्रगती, उपस्थिती व शैक्षणिक उपक्रमातील सहभाग, अंतर्गत मूल्यमापन, परीक्षेतील उपस्थिती व प्रगती, महाविद्यालयातील वर्तन, महाविद्यालयात चालविले जाणारे विविध कोर्सेस इत्यादी विषयी पालकांना माहिती देतील. या सर्व कामांमध्ये विद्यार्थ्यांनी गट मार्गदर्शक प्राध्यापकांना पूर्ण सहकार्य करावयाचे आहे.

## परीक्षा विभाग (Examination)

**नियमावली :**

१) महाविद्यालयातील सर्व सत्र, सराव परीक्षा व निरंतर अंतर्गत मूल्यमापनसाठी विद्यार्थ्यांची उपस्थिती बंधनकारक आहे.

२) NEP - 2020 नुसार खालीलप्रमाणे मुल्यमापन होईल.
✻ बाह्य सत्रान्त परीक्षा मूल्यमापन ६०% गुणांचे व अंतर्गत मूल्यमापन ४०% गुणांचे असेल.
✻ प्रत्येक कोर्स उत्तीर्ण होण्यासाठी किमान ४०% गुण (बाह्य/सत्रान्त परिक्षेत व अंतर्गत मूल्यमापनात स्वतंत्रपणे.) मिळवणे आवश्यक आहे.

३) प्रत्येक विषयात उत्तीर्ण होण्यासाठी किमान ४०% गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.

४) सर्व परीक्षांचा अंतिम निकाल ग्रेड, ग्रेड पॉईंट व क्रेडीट पद्धतीचा अवलंब करून तयार केला जाईल.

५) अंतर्गत मूल्यमापन प्रश्नमंजूषा, घटक चाचणी, प्रकल्प अहवाल लेखन, सादरीकरण, सृजनशील लेखन, गृहपाठ इ. पैकी किमान तीन घटकावर आधारीत असेल.

६) परीक्षा पद्धतीविषयी सर्व सूचना वेळोवेळी विद्यार्थ्यांना देण्यात येतील. त्याचे काटेकोरपणे पालन करणे सर्वांना बंधनकारक असेल.

## विद्यार्थी कल्याण विभाग (Students Welfare Department)

प्रत्येक विद्यार्थी हा महाविद्यालयाचा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. त्यामुळे त्याचे जीवन सुंदर व सुखकारक होण्यासाठी महाविद्यालयास जे जे करता येणे शक्य आहे ते निश्चितपणे केले जाते. विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी शासन, विद्यापीठ व विविध संस्थांकडून दिल्या जाणाऱ्या सवलती व शिष्यवृत्या विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी हा विभाग प्रयत्न करतो.

## सवलती –

| अ.क्र. | फी सवलतीचे नाव | पात्रता | उत्पन्नाची मर्यादा | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|---|
| १. | E.B.C./ E.W.S./ S.E.B.C. | ज्या विद्यार्थ्यांच्या आई, वडील, पालकांचे नेहमीचे वास्तव्य महाराष्ट्रात आहे त्यांनाच फक्त महाराष्ट्रातील शासनमान्य शिक्षणसंस्थेत ही सवलत मिळू शकते. | रुपये ८,००,०००/- | १. इ.बी.सी. सवलतीचा अर्ज व प्रतिज्ञापत्र दोन प्रतीत.<br>२. तहसिलदार यांचा उत्पन्नाचा दाखला.<br>३. हयात मुलांची जन्मक्रमांकाने नावे व जन्मतारखा असलेला कुटुंब माहितीचा पालकांचा दाखला.<br>४. रेशनकार्ड झेरॉक्स प्रत. |
| २. | **प्राथमिक, माध्यमिक शिक्षकांच्या मुला-मुलींसाठी** | सरकारी, स्थानिक स्वराज्य संस्था (नगरपालिका, महानगरपालिका व जिल्हा परिषद) मान्यताप्राप्त अनुदानित खाजगी प्राथमिक, माध्यमिक शाळांतील शिक्षकांची मुले व मुली. | शासन नियमाप्रमाणे | १. पी.टी.सी./एस.टी.सी. सवलतीचा अर्ज.<br>२. हयात मुलांची जन्मक्रमांकाने नावे व जन्मतारखा असलेला कुटुंब माहितीचा पालकांचा दाखला.<br>३. रेशनकार्ड झेरॉक्स प्रत. |
| ३. | **सैनिकांच्या मुलांसाठी** | भारतीय सैन्य दलातील सैनिकांची मुले व मुली | शासन नियमाप्रमाणे | १. सैनिकांच्या मुलांना मिळणाऱ्या फी सवलतीचा अर्ज दोन प्रतीत.<br>२. गुणपत्रकाची सत्यप्रत.<br>३. जिल्हा सैनिक बोर्डाचे योग्यता प्रमाणपत्र. |

**शिष्यवृत्ती :** गुणवत्ताधारक व पात्र विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे विविध प्रकारच्या शिष्यवृत्त्यांची सोय उपलब्ध करून दिली जाते.

| अ.क्र. | शिष्यवृत्तीचे नाव | पात्रता | उत्पन्नाची मर्यादा | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|---|
| १. | विद्यार्थी सहाय्य निधी | दारिद्र्य रेषेखालील व चांगली शैक्षणिक गुणवत्ता असणारे विद्यार्थी | शासन नियमाप्रमाणे | १. विद्यार्थी सहाय्य निधीचा अर्ज<br>२. गुणपत्रकाची सत्यप्रत<br>३. रेशनकार्डची सत्यप्रत<br>४. दारिद्र्य रेषेखालील प्रमाणपत्राची सत्यप्रत |
| २. | अपंग शिष्यवृत्ती | ४०% अपंग असणारे विद्यार्थी | शासन नियमाप्रमाणे | १. अपंग शिष्यवृत्ती अर्ज<br>२. अपंगत्व दर्शविणारे सिव्हील सर्जनचे प्रमाणपत्र<br>३. उत्पन्नाचा दाखला (तहसिलदार)<br>४. गुणपत्रकाची सत्यप्रत |
| ३. | राज्य सरकारची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती | १२ वी मध्ये ७०% गुण मिळवलेले विद्यार्थी | शासन नियमाप्रमाणे | १. राज्यसरकारच्या खुल्या गुणवत्ता शिष्यवृत्तीचा अर्ज<br>२. १२ वी गुणपत्रकेच्या दोन सत्यप्रती |
| ४. | भारत सरकारची मागास व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती | अनुसूचित जाती, विमुक्त भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थी | २,५०,०००/- (अनु. जातीतील विद्यार्थ्यांसाठी)<br><br>१,५०,०००/- (इतर मागासवर्गीय, विमुक्त भटक्या जमातीतील विद्यार्थ्यांसाठी) | १. शिष्यवृत्ती अर्ज (पासपोर्ट साईज फोटोसह)<br>२. गुणपत्रकाची सत्यप्रत<br>३. तहसिलदाराचा उत्पन्नाचा दाखला (वडील हयात नसल्यास आईचा उत्पन्नाचा दाखला व सोबत वडिलांचा मृत्यू दाखला आवश्यक.)<br>४. जातीच्या दाखल्याची सत्यप्रत (तहसिलदार) इतर मागास व विमुक्त भटक्या जमाती प्रवर्गातील नॉन क्रेमीलेअर सर्टिफिकेट<br>५. आधारकार्ड झेरॉक्स |
| ५. | फ्रि शिप शिष्यवृत्ती (फी माफी योजना) | अनुसूचित जाती, विमुक्त भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थी | शासन नियमाप्रमाणे | १. फ्री अर्ज<br>२. गुणपत्रकाची सत्यप्रत<br>३. जातीच्या दाखल्याची सत्यप्रत (तहसिलदार)<br>४. नॉन क्रेमीलेअर सर्टिफिकेट (तहसिलदार) किंवा आई-वडील नोकरीस असल्यास त्यांचे वेतन प्रमाणपत्र<br>५. आधारकार्ड झेरॉक्स |

**वरील शिष्यवृत्तीसाठी अर्ज करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा फोंडाघाटमध्ये बचत खाते असणे बंधनकारक आहे.**

# महाविद्यालयीन शिस्तीविषयी सर्वसाधारण नियमावली

**(General Rules for College Discipline)**

## सभा-समारंभासंबंधी -

१) विद्यार्थ्यांनी कोणतीही सभा, समारंभ किंवा कार्यक्रमाच्या नियोजनासाठी किमान आठ दिवस अगोदर संबंधित विभागप्रमुखांशी संपर्क साधावा.

२) सभा, समारंभ कार्यक्रमाचे पाहुणे व अध्यक्ष तसेच त्यामधील विषय ठरविणे महाविद्यालयाच्या हिताच्या दृष्टीने प्राचार्यांच्या पूर्व परवानगीशिवाय करता येणार नाही.

३) विद्यार्थ्यांनी सभा, समारंभ व कार्यक्रमांमध्ये स्वेच्छेने सहभागी होऊन तो यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे.

४) विविध कला गुणदर्शन कार्यक्रमासंबंधी अंतिम निर्णय प्राचार्यांचा असेल.

## मालमत्तेसंबंधी -

१) महाविद्यालयीन मालमत्तेचे नुकसान होणार नाही याची काळजी प्रत्येक विद्यार्थ्याने घेतली पाहिजे.

२) महाविद्यालयीन मालमत्तेची मोडतोड व नासधूस केल्यास संबंधित विद्यार्थ्यांकडून नुकसान भरपाई भरून घेतली जाईल.

## रॅगिंग संबंधी -

सर्वोच्च न्यायालय, यू.जी.सी. नियमावली व मुंबई विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार महाविद्यालयात ''Anti Ragging Cell'' कार्यरत आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने दरवर्षी ''Online Anti Ragging Affidavit / Understanding'' ऑनलाईन सबमिट करणे आवश्यक आहे. त्यानंतरच महाविद्यालयात प्रवेश दिला जाईल.

### रॅगिंगला नकार : आनंदाला होकार, चारित्र्याचा स्वीकार. रॅगिंग हा दखलपात्र गुन्हा आहे.

Contact - Anti-Ragging Helpline Number - 18001805522.
अधिक माहितीसाठी www.antiragging.in वरील माहिती वाचावी.
Anti-Ragging Helpline Email - helpline@antiragging.in

मुंबई विद्यापीठ मुंबई व विद्यापीठ अनुदान मंडळ, दिल्ली यांच्या परिपत्रकानुसार रॅगिंगमध्ये दोषी विद्यार्थ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

## प्रसिद्धीसंबंधी -

१) महाविद्यालय व संस्थेसंबंधी असलेली माहिती व वृत्त प्राचार्यांच्या पूर्व परवानगीशिवाय परस्पर प्रसिद्धी माध्यमांना देऊ नये.

२) महाविद्यालय व संस्थेबाबत बदनामीकारक मजकूर प्रकाशित किंवा प्रसारित झाल्यास संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

## ओळखपत्रासंबंधी –

१) महाविद्यालयीन परिसरात विद्यार्थ्यांसोबत ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

२) महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी ओळखपत्राची मागणी करताच ते दाखवावे.

३) ओळखपत्र हरवल्यास अथवा खराब झाल्यास तसा अर्ज करून त्याचे शुल्क भरावे, त्यानंतर नवीन ओळखपत्र दिले जाईल.

## मोबाईलसंबंधी –

१) महाराष्ट्र शासनाच्या अध्यादेशानुसार विद्यार्थ्यांना वर्गात मोबाईल वापरता येणार नाही.

## वाहनासंबंधी –

१) विद्यार्थ्यांनी आपली वाहने विहित जागेवरच लावावीत. ती इतरत्र प्रवेशद्वारासमोर किंवा कार्यालयासमोर लावू नयेत.

२) महाविद्यालयात येणे–जाणेसाठी एसटी महामंडळामार्फत मुलींसाठी मोफत तर मुलांसाठी सवलतीच्या दरात एसटी प्रवासाची सुविधा उपलब्ध आहे.

## धुम्रपानासंबंधी –

१) महाविद्यालय परीसरात तंबाखू, मावा, गुटखा, पान सेवनास तसेच विडी, सिगारेट ओढण्यास बंदी आहे.

२) धुम्रपान करणाऱ्यांविरूद्ध सक्त कारवाई केली जाईल.

## शिस्तीसंबंधी –

१) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे.

२) महाविद्यालयात व वर्गात विद्यार्थी, कर्मचारी किंवा संस्थाचालकांशिवाय कोणासही परस्पर प्रवेश करता येणार नाही. पालकांना आपल्या पाल्याला भेटावयाचे असल्यास कार्यालयाशी संपर्क साधावा.

३) प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयीन शिस्त पाळणे आवश्यक आहे.

४) महाविद्यालयात शिस्तीबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही.

५) विद्यार्थ्यांच्या खालील वर्तनाचा शिस्तभंगात समावेश होतो –
गटबाजी करणे, गोंधळ घालणे, भांडण करणे, सामूहिक सुट्टी घेणे, छेडछाड करणे, कर्मचाऱ्यांशी उद्धट वर्तन करणे, त्यांचा आज्ञाभंग करणे, महाविद्यालयाच्या इमारतीवर, डेस्कवर, फलकावर असभ्य मजकूर लिहिणे व चित्रे काढणे, वर्ग सुरू असताना व्हरांड्यात रेंगाळणे, वर्गासमोर उभे राहून विक्षिप्त हावभाव करणे इत्यादी.

६) बेशिस्त वर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना तोंडी किंवा पत्राने सूचना दिली जाईल. त्यानंतरही त्यांच्या वर्तनात बदल न झाल्यास त्यांच्या शैक्षणिक सवलती बंद केल्या जातील. परीक्षेस प्रतिबंध करून प्रवेश रद्द केला जाईल. विशिष्ट प्रसंगी पोलिस कारवाईसुद्धा केली जाईल.

## परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षा सूची

**(Panishment for Malpractices in Examination)**

### अ) परीक्षा पूर्व कालावधीमध्ये गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षासूची

| अ.क्र. | गैरप्रकार | शिक्षा |
|---|---|---|
| १. | परीक्षेच्या आवेदनपत्रात जाणूनबुजून खोटी माहिती भरणे. | संबंधीत संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द. |
| २. | प्रात्यक्षिक परीक्षेच्यावेळी गैरमार्गाचा वापर करणे. | संबंधीत विषयातील प्रात्यक्षिक परीक्षेची संपादणूक रद्द. |
| ३. | परीक्षा केंद्रावरून किंवा इतर ठिकाणाहून उत्तरपत्रिका अनधिकृतपणे हस्तगत करणे / त्याचा वापर करणे / इतरांस देणे. | संबंधीत संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द आणि पुढील एका परीक्षेस प्रतिबंध. |
| ४. | खोटे वैद्यकिय प्रमाणपत्र / अपघाताचा / अपंगत्वाचा दाखला आणून लेखनिकासह परीक्षेस बसण्याचा प्रयत्न करणे. | संबंधीत संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द आणि पुढील एका परीक्षेस प्रतिबंध. |
| ५. | एकाच शैक्षणिक वर्षात एकापेक्षा अधिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणे. | संबंधीत संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द. |
| ६. | प्रवेश पत्रिकेवर अनधिकृत बदल करणे / दुसऱ्याचा फोटो चिकटवणे / प्राचार्यांची स्वाक्षरी करणे / सहीच्या शिक्याचा वापर करून आपल्या ठिकाणी तोतयास परीक्षेस बसविणे. | |
| ७. | खोटे प्रमाणपत्र / गुणपत्रिका / कागदपत्रे देवून प्रथम / द्वितीय / तृतीय किंवा पदव्युत्तर वर्गात प्रवेश मिळविणे. | अ) प्रवेश रद्द<br>ब) महाराष्ट्रातील कोणत्याही शिक्षण संस्थेत/ विद्यापीठात दोन वर्ष प्रवेशास प्रतिबंध.<br>क) पोलीस केस करणे.<br>ड) संबंधीत संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द. |

### ब) परीक्षा दालनात गैरमार्गाचा अवलंब करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षासूची

| | | |
|---|---|---|
| ८. | परीक्षा सुरू असताना इतर परीक्षार्थीसोबत गैरहेतूने संपर्क साधणे / एकमेकांचे पाहून लिहिणे. | संबंधीत पेपरच्या परीक्षेची संपादणूक रद्द करणे पुढील एका परीक्षेस प्रतिबंध आणि पोलीस केस करणे. |
| ९. | हेतूपुर्वक हत्यार बाळगणे / शरीरास इजा होतील अशा वस्तू बाळगणे. | संबंधीत पेपरच्या परीक्षेची संपादणूक रद्द. पुढील एका परीक्षेस प्रतिबंध आणि पोलीस केस करणे. |
| १०. | स्वत: किंवा इतर व्यक्तीमार्फत धमक्या देणे, पर्यवेक्षक / दक्षता पथक / केंद्र संचालक / सहा. केंद्र संचालक यांच्याशी प्रतिवाद करणे, अपमानास्पद बोलणे. | संबंधीत पेपरच्या परीक्षेची संपादणूक रद्द. पुढील एका परीक्षेस प्रतिबंध आणि पोलीस केस करणे. |

| अ.क्र. | गैरप्रकार | शिक्षा |
|---|---|---|
| ११. | उत्तरपत्रिकेवर खुणा करणे/विशिष्ट चिन्ह काढणे/ स्वत:चे नाव लिहिणे/अन्य कोणत्यातरी मार्गाने आपली ओळख पटवण्याचा प्रयत्न करणे. | संबंधीत संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द. |
| १२. | उत्तरपत्रिकेत प्रक्षोभक भाषेचा वापर शिवीगाळ/ गलिच्छ मजकूर लिहिणे/धमक्या देणे. | संबंधीत विषयाच्या परीक्षेची संपादणूक रद्द. |
| १३. | परीक्षा सुरू असताना संबंधीत विषयाचे/पेपरचे कागद, मुद्रीत पेपर, डायऱ्या, वह्या, टिपण्या, मार्गदर्शिका, पुस्तकातील पाने, नकाशे इ. स्वत:जवळ बाळगणे, कपड्यावर हातावर किंवा शरीराच्या भागावर लिहून आणणे (कॉपी साहित्याचा वापर उत्तरपत्रिकेसाठी केलेला असो अथवा नसो.) | संबंधीत विषयाच्या परीक्षेची संपादणूक रद्द. |
| १४. | स्वत: दुसऱ्या परीक्षार्थ्यांना किंवा दुसऱ्याकडून स्वत: कागदाची चिठ्ठी/चिठ्ठ्या/उत्तरपत्रिका/ प्रश्नपत्रिका/पुरवणी उत्तरपत्रिका देणे किंवा घेणे. | संबंधीत विषयाच्या परीक्षेची संपादणूक रद्द. |
| १५. | स्वत:ची/इतरांची उत्तरपत्रिका किंवा पुरवणी उत्तरपत्रिका नष्ट करणे. | संबंधीत विषयाच्या परीक्षेची संपादणूक रद्द. |
| १६. | दक्षता पथक किंवा परीक्षा मंडळाचे सदस्य किंवा व्यवस्थापन समितीचे सदस्य किंवा अधिकृतपणे भेट देणाऱ्या अधिकाऱ्यांच्या भेटीच्या वेळी विद्यार्थ्याने त्याच्याकडील अवैध साहित्य दुसरीकडे टाकणे/फेकणे. | संबंधीत विषयाच्या परीक्षेची संपादणूक रद्द. |
| १७. | लेखी विनंतीसह उत्तरपत्रिकेला चलनी नोटा जोडणे. | संबंधीत विषयातील परीक्षेची संपादणूक रद्द व नोटा विद्यापीठाकडे जमा |
| १८. | उत्तरे लिहून देण्यासाठी किंवा इतर अनधिकृत कार्यासाठी वेळेआधी प्रश्नपत्रिका बाहेर पाठविणे किंवा घेवून जाणे. | संबंधीत संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द व पोलीस केस करणे. |
| १९. | जर एखाद्या केंद्रावर सामूहिक कॉपी झाली असल्याचा अधिकृत अहवाल आला असल्यास | सर्व परीक्षार्थींची संबंधीत पेपरची परीक्षा रद्द |
| २०. | स्वत:ची लिहिलेली उत्तरपत्रिका घेवून जाणे/ बाहेरून लिहून आणलेली उत्तरपत्रिका घेवून येणे/जाणे. | संबंधीत संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द करणे व पुढील दोन परीक्षेस प्रतिबंध. |
| २१. | स्वत:च्या हस्ताक्षरात उत्तरपत्रिका घेवून जाणे/ बाहेरून लिहून आणलेली उत्तरपत्रिका घेऊन येणे/जाणे. | संबंधीत संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द करणे व पुढील तीन परीक्षेस प्रतिबंध,पोलीस केस करणे. |
| २२. | तोतया विद्यार्थी त्या परीक्षेस बसल्यास | संबंधीत संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द करणे व पुढील तीन परीक्षेस प्रतिबंध,पोलीस केस करणे. पोलिसांकडे तक्रार नोंदविणे व सेवेत असल्यास संबंधीत कार्यालयात योग्य कार्यवाहीसाठी कळविणे. |
| २३. | तोतया विद्यार्थी विद्यापीठाच्या पुढील परीक्षेस बसला असल्यास | |
| २४. | तोतया विद्यार्थी हा बाहेरील व्यक्ती असल्यास | |

## क) परीक्षेत्तर कालावधीमध्ये गैरमार्गाचा अवलंब करणाऱ्यास शिक्षा

| अ.क्र. | गैरप्रकार | शिक्षा |
|---|---|---|
| १. | पर्यवेक्षक/परीक्षक/परीक्षा नियंत्रक/कस्टोडियन/ परीक्षेशी संबंधीत यंत्रणेशी स्वत: संपर्क साधणे अथवा धमकी देणे/मारहाण करणे. | संबंधीत पेपरच्या परीक्षेची संपादणूक रद्द व पुढील दोन परीक्षांना प्रतिबंध, पोलीस केस करणे. |
| २. | विद्यापीठातर्फे देण्यात येणारे प्रमाणपत्र किंवा गुणपत्रिका किंवा इतर कोणत्याही दस्ताऐवजात अनधिकृतपणे बदल करणे/खाडाखोड करणे. | संबंधीत पेपरच्या परीक्षेची संपादणूक रद्द व पुढील दोन परीक्षांना प्रतिबंध, पोलीस केस करणे. |
| ३. | परीक्षकाने मूल्यांकन करताना सामूहिकरित्या कॉपी केल्याबद्दल अहवाल सादर केल्यास व सबळ पुरावा असल्यास | सर्व संबंधीत परिक्षार्थ्यांची संबंधीत परीक्षा रद्द. |
| ४. | वरील गैरप्रकाराखेरीज अन्य स्वरूपाचे गैरप्रकार आढळून आल्यास त्या गैरप्रकारांच्या स्वरूपानुसार शिक्षा करण्याचे अधिकार विद्यापीठ परीक्षा मंडळाने राखून ठेवलेले आहेत. असे गैरप्रकार संबंधीत घटकांनी विद्यापीठाकडे पाठवून द्यावेत. | |

## कामकाज वेळ (सोमवार ते शनिवार)

| | | |
|---|---|---|
| महाविद्यालयीन शिक्षकांची वेळ | : | सकाळी ०७.५० ते दुपारी ०१.३० वाजेपर्यंत |
| अध्यापन कामकाज वेळ | : | सकाळी ०८.०० ते दुपारी ०१.०० वाजेपर्यंत |
| ग्रंथालय कामकाज वेळ | : | सकाळी ०९.०० ते सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत |
| कार्यालय कामकाज वेळ | : | सकाळी ०९.३० ते सायंकाळी ०४.३० वाजेपर्यंत |

**टीप :** १. विद्यापीठाकडून येणाऱ्या वेळापत्रकात बदल झाल्यास महाविद्यालयाच्या सूचना फलकावर जाहीर केले जातील.

२. सार्वजनिक सुट्ट्यांविषयीची माहिती सूचना फलकावर वेळोवेळी जाहीर केली जाईल.

## कला शाखा (अनुदानित) शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी
## Arts Faculty (Aided) Teaching & Non-Teaching Staff

| | | |
|---|---|---|
| डॉ. पुरंधर धनपाल नारे | M.Com., M.Phil., Ph.D. | प्राचार्य |
| डॉ. सतीश नारायण कामत | M.A., B.Ed., NET, Ph.D. | मराठी, प्राध्यापक |
| डॉ. संतोष रघुनाथ रायबोले | M.A., B.Ed., M.Phil., NET, Ph.D. | हिंदी, सहयोगी प्राध्यापक |
| लेफ्ट. डॉ. राज भुजंगराव ताडेराव | M.A., B.Ed., M.Phil., NET, Ph.D. | इतिहास, सहयोगी प्राध्यापक |
| डॉ. राजाराम बाळासोा पाटील | M.A., Ph.D. | भूगोल, सहयोगी प्राध्यापक |
| डॉ. बालाजी आण्णासाहेब सुरवसे | M.A., B.P.Ed., Ph.D. | अर्थशास्त्र, सहयोगी प्राध्यापक |
| डॉ. सौ. विद्या शरद मोदी | M.A., M.Lib., M.Phil., Ph.D. | ग्रंथपाल |
| प्रा. संतोष मधुकर आखाडे | M.A., NET | इंग्रजी, सहाय्यक प्राध्यापक |
| प्रा. जगदीश पांडूरंग राणे | M.A., M.Phil. | मराठी, सहाय्यक प्राध्यापक |
| प्रा. विनोदसिंह विलासराव पाटील | M.A., M.Phil. | इंग्रजी, सहाय्यक प्राध्यापक |
| श्री. दिपक विजय सावंत | B.A., B.Ed. | मुख्य लिपिक |
| श्री. दिलीप गोपाळ सावंत | H.S.C. | ग्रंथालय परिचर |
| श्री. संतोष चंद्रकांत पेडणेकर | F.Y.B.A. | शिपाई |
| श्रीम. सायली सुहास राणे | B.A. | शिपाई |

## वाणिज्य शाखा (विनानुदानित) शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी
## Commerce Faculty (Non Aided) Teaching & Non-Teaching Staff

| | | |
|---|---|---|
| डॉ. बाजीराव यशवंत डाफळे | M.Com., Ph.D. | वाणिज्य, सहाय्यक प्राध्यापक |
| प्रा. रुपाली रविंद्र पाटील | M.Com. | वाणिज्य, सहाय्यक प्राध्यापक |
| प्रा. संजय महादेव पाटील | M.Com., B.Ed., GDC & A, CHM. | अकौंटन्सी, सहाय्यक प्राध्यापक |
| प्रा. पल्लवी संतोष साटम | M.Com. | वाणिज्य, सहाय्यक प्राध्यापक |
| श्री. अमित सोनू गोसावी | B.Com., D.T.Ed., MSCIT | कनिष्ट लिपिक |

# Fee Structure From 2025-2026

महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेतेवेळी खाली नमूद केल्याप्रमाणे फी भरावी लागेल.

| Class | Tution | Library | Gymkhana | Other (Extra) Curiculiar Activity | Enrolment | Utility | Magazine | Development | Computer & Internet | Uni Sports & Cultural | NSS | Sports Contrubution | Labrotary Fees | Disaster Relief Fund | Admission & Procession | ID Card & Library Card | Group Insurance | Student Development Fees | Vice Chancellor Fund | Allumini | E Suvidha & E. Charge | Caution Money | Library Deposite | Admission Form | EDCA | Prospectus | E Governance & Digitization | Total Fees |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | **28** |
| F.Y.B.A. | 800 | 200 | 400 | 365 | 220 | 250 | 100 | 882 | 500 | 36 | 10 | 60 | 0 | 10 | 200 | 80 | 74 | 50 | 20 | 25 | 79 | 150 | 250 | 100 | 10 | 100 | 79 | **5050** |
| F.Y.B.Com. | 5250 | 200 | 400 | 365 | 220 | 250 | 100 | 882 | 500 | 36 | 10 | 60 | 0 | 10 | 200 | 80 | 74 | 50 | 20 | 25 | 79 | 150 | 250 | 100 | 10 | 100 | 79 | **9500** |
| **Scholarship** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **250** | **100** | **882** | **0** | **36** | **10** | **0** | **0** | **10** | **0** | **0** | **54** | **0** | **20** | **25** | **79** | **150** | **250** | **100** | **10** | **100** | **79** | **2865** |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| S.Y.B.A. | 800 | 200 | 400 | 365 | 0 | 250 | 100 | 882 | 500 | 36 | 10 | 60 | 800 | 10 | 200 | 80 | 74 | 50 | 20 | 25 | 79 | 0 | 0 | 100 | 10 | 100 | 79 | **5230** |
| S.Y.B.Com. | 5250 | 200 | 400 | 365 | 0 | 250 | 100 | 882 | 500 | 36 | 10 | 60 | 800 | 10 | 200 | 80 | 74 | 50 | 20 | 25 | 79 | 0 | 0 | 100 | 10 | 100 | 79 | **9680** |
| **Scholarship** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | 250 | **100** | **882** | **0** | **36** | **10** | **0** | **800** | **10** | **0** | **0** | **54** | **0** | **20** | **25** | **79** | **0** | **0** | **100** | **10** | **100** | **79** | **3265** |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| T.Y.B.A. | 800 | 200 | 400 | 365 | 0 | 250 | 100 | 882 | 500 | 36 | 10 | 60 | 800 | 10 | 200 | 80 | 74 | 50 | 20 | 25 | 79 | 0 | 0 | 100 | 10 | 100 | 79 | **5230** |
| T.Y.B.Com. | 5250 | 200 | 400 | 365 | 0 | 250 | 100 | 882 | 500 | 36 | 10 | 60 | 800 | 10 | 200 | 80 | 74 | 50 | 20 | 25 | 79 | 0 | 0 | 100 | 10 | 100 | 79 | **9680** |
| **Scholarship** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **250** | **100** | **882** | **0** | **36** | **10** | **0** | **800** | **10** | **0** | **0** | **54** | **0** | **20** | **25** | **79** | **0** | **0** | **100** | **10** | **100** | **79** | **3265** |

✻ दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी कार्यालय बंद राहिल. ✻ शासनाच्या नियमानुसार फीमध्ये बदल झाल्यास त्यानुसार फी भरावी लागेल.

✻ वरील फी शिवाय विद्यापीठ नियमानुसार असणारी परीक्षा फी प्रत्येक सेमिस्टरसाठी भरावी लागेल.

✻ स्कॉलरशिप धारक विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती फॉर्म न भरल्यास किंवा त्यांचा शिष्यवृत्ती फॉर्म नामंजूर झाल्यास संपूर्ण वर्षाची फी भरावी लागेल.

Fee structure is likely to be revised. Student has to pay difference if any.




Chief Guest Hon. Jayprakash Parab, Deputy CEO ZP Sindhudurg, sharing his valuable guidance with the students on Annual prize distribution function.




Recourse Person Prof. (Dr.) Santosh Rathod (Head of the English Dept. at the Centre for Distance and Online Education, University of Mumbai.)




Cake Making Course – Guidance by Shri Palav and Shri. Kharat




Marathi Langauage Fortnight - Guidance By Aarya Bhogale




Competitive Exam. Guidance by Shri S. B. Patil




Hon. Vinayak Joshi, Branch Manager, TJSB providing guidance on Budget 2026..




Glimpses of government certificate distribution to students by Hon. Naib Tehsildar Mr. Gangaram Ko kare, Chairman Mr. Mahesh Sawant, Principal Dr. Purandhar Nare & dignitaries.




Assistant Commissioner Mr. Bhaiyyaji Yerme guided at the Mega Employment Fair at Phondaghat College.




Principal Dr. Dilip Bharamal inaugurating the Interdisciplinary National Conference.




Free Health Check-up Camp at the college by D.Y. Patil Hospital, Kolhapur.




Dr. Abdul Wakil addressing the gathering at the inauguration of the International Conference.




Dr. Balaji Survase receiving the "Education ICON Awards 2026" from Former Rajya Sabha MP Brig. Sudhir Sawant.